**ठळक बातम्या**

- अयोध्या मंदिर दान अपहार प्रकरणी केंद्र आणि राज्यसरकारला तसंच श्री रामजन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाला सर्वोच्च न्यायालयाच्या नोटिसा

- राज्यातली मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठीची अनुदानप्राप्त ६ वसतिगृह बंद असल्याचं कॅगचं निरीक्षण, इतर वसतिगृहांची परिस्थितीही खराब

- स्पर्धा परीक्षा घोटाळ्याच्या विरोधात कॉकरोच जनता पार्टी आणि सोनम वांगचुक यांनी सुरू केलेल्या आंदोलनाला उद्धव ठाकरे यांचा पाठिंबा

- पुणे जिल्ह्यात वारी मार्गावर अपघातात ३ महिलांचा मृत्यू

**आणि**

- लंडनच्या लॉर्ड्स मैदानावर झालेल्या पहिल्या महिला कसोटी क्रिकेट सामन्यात भारताचा इंग्लंडवर २७० धावांनी दणदणित विजय

**<><><><><><>**

अयोध्येच्या रामजन्मभूमी मंदिरात देणग्या आणि दानातल्या वस्तूंचा अपहार झाल्याच्या आरोपांची न्यायालयीन देखरेखीखाली चौकशी करण्याचे आदेश मागणाऱ्या याचिकासमूहावर सर्वोच्च न्यायालयानं केंद्र आणि उत्तरप्रदेश सरकारला तसंच राममंदिराचं व्यवस्थापन पाहणाऱ्या श्री रामजन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाला नोटिसा बजावल्या आहेत . सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही मोहना यांच्या पीठासमोर याचिकांची सुनावणी होत आहे. या प्रकरणी चौकशी करणाऱ्या उत्तर प्रदेश पोलिसांच्या तपासपथकानं चौकशीच्या प्रगतीचा अहवाल सादर करावा असंही न्यायलयानं सांगितलं.

**<><><><><>**

मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी बांधलेल्या परंतु बंद असलेल्या राज्यातल्या सहा वसतिगृहांना गेली चार वर्ष सरकारी अनुदान मात्र मिळत असल्याचं कॅग, अर्थात नियंत्रक आणि महालेखापरीक्षकां च्या अहवालात म्हटलं आहे. यातली चार वसतिगृहं जालना जिल्ह्यात असून एक लातूर आणि एक बुलढाणा जिल्ह्यातलं आहे. या वसतिगृहांची अवस्था अतिशय वाईट असून गेली चार वर्ष त्यात एकही विद्यार्थी राहत नाही. तरीही राज्य सरकारच्या सामाजिक न्याय विभागाकडून या वसतिगृहांना दीड कोटी रुपयांहून अधिक अनुदान दिल गेलं असल्याचं निरिक्षण अहवालात नोंदवलं आहे. इतर वसतिगृहांची परिस्थिती वाईट असून विद्यार्थ्यांना प्राथमिक सोयी सुविधाही मिळत नसल्याचं अहवालात म्हटलं आहे. राज्यातल्या ४९ सरकारी वसतिगृहांमध्ये पर्यवेक्षक नाही, तर मुलींसाठी असलेल्या ५ वसतिगृहांमध्ये पुरुष पर्यवेक्षक नेमले गेल्यां निरीक्षणही कॅगनं नोंदवलं आहे. २०२० सालापर्यंत २०० वसतिगृह बांधण्याचं सरकारच उद्दिष्ट पुरेसा निधी मंजूर झाला असूनही पूर्ण झालेलं नाही .

**<><><><><>**

स्पर्धा परीक्षांमधील कथित गैरव्यवहारांविरोधात दिल्लीत जेएनयू आणि जंतरमंतर परिसरात कॉकरोच जनता पार्टी आणि पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी सुरू केलेल्या आंदोलनाला माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज जाहीर पाठिंबा दिला. कोणत्याही राजकीय झेंड्याविना, राजकीय मतभेद दूर सारून सर्वच राजकीय पक्षांनी तसंच लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी यात सहभागी व्हावं, असं आवाहन त्यांनी मुंबईत वार्ताहर परिषदेत केलं. नीट परीक्षा पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा आणि पीडित विद्यार्थ्यांना नुकसानभरपाई मिळावी, ही आंदोलकांची मागणी योग्य असल्याचं ठाकरे म्हणाले. येत्या २० जुलै रोजी आंदोलकांच्या संसद मोर्चाला

पाठिंबा देण्यासाठी शिवसेना महाराष्ट्रातही आंदोलन करणार असल्याचं ठाकरे यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज त्यांच्या वर्षा निवासस्थानी तीन महत्त्वाच्या बैठका झाल्या. एसटी, अर्थात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या आगारांच्या पुनर्विकासाला सार्वजनिक-खाजगी भागीदारीच्या माध्यमातून गती देण्यासाठी आवश्यक धोरणात्मक प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करावा, असे निर्देश त्यांनी परिवहन विभागाच्या बैठकीत दिले. प्रत्येक आगाराची व्यावसायिक क्षमता लक्षात घेऊन स्वतंत्र नियोजन करायला हवं असं ते म्हणाले.

कामगारांसंबंधी विविध कायद्यांमध्ये कामगार विभागाच्या माध्यमातून सुधारणा करण्यात येत आहेत. या सुधारणांमधून व्यापक 'कामगार हित' जपण्याला प्राधान्य द्यावं, असं मुख्यमंत्र्यांनी कामगार कायद्यांच्या सुधारणा सादरीकरण बैठकीत सांगितलं.

नगर विकास विभागाच्या आढावा बैठकीत अर्बन चॅलेंज फंड अभियानाच्या आराखड्यावर सविस्तर चर्चा झाली. शहरी विकासात सृजनशील बदल घडवून आणण्यासाठी शहरांना विकासाचं केंद्र मानून त्यांच्या प्रगतीतले अडथळे दूर करण्यासाठी अर्बन चॅलेंज फंडच्या माध्यमातून विकास करण्यात यावा, असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं.

**<><><><><><>**

अहिल्यानगर शहरात आज ज्ञानेश्वर आणि निवृत्तीनाथ या दोन भावंडांच्या दिंड्यांची भेट झाली. त्यानंतर आज सकाळी या दिंड्या पंढरपूरकडे मार्गस्थ झाल्या. या प्रमुख दिंड्यांबरोबर गावागावातून येणाऱ्या संत नामदेव महाराज, संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्यासह विविध दिंड्या शहरांमध्ये दाखल होत आहेत.

**<><><><><><>**

पुणे जिल्ह्यात सासवड–जेजुरी मार्गावर संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीच्या पुढं जात असलेल्या वारकरी दिंडीच्या ट्रकनं धडक दिल्यामुळे तीन वारकरी महिलांचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात चार वारकरी जखमी झाले असून, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. हा ट्रक  नांदेड जिल्ह्यातल्या एका दिंडीचा होता. ट्रक चालकाला ताब्यात घेतलं असल्याचं पोलिसांनी सांगितलं. मृत महिला सांगली जिल्ह्यातल्या कसबे डिग्रज गावच्या रहिवाशी होत्या.

उपमुख्यमंत्री आणि पुण्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी या घटनेबद्दल दु:ख व्यक्त केलं असून, जखमी वारकरी भगिनींची रुग्णालयात जाऊन भेट घेतली. पंढरीच्या वाटेवर निघालेल्या वारकऱ्यांची सुरक्षितता ही आपली सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. त्यामुळे सर्वांनी वाहन चालवताना चालणाऱ्या वारकऱ्याची काळजी घ्यावी, असं आवाहन पवार यांनी केलं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी या अपघाताबद्दल दु:ख व्यक्त केलं आहे. मृतांच्या कुटुंबियांना त्यांनी राज्य सरकारतर्फे प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत जाहिर केली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही या अपघाताबद्दल दु:ख व्यक्त केलं आहे. ही घटना दुर्दैवी असून, पंढरीच्या वारीमध्ये संपूर्ण सुरक्षितता आणि सावधानतेच्या उपाययोजना करण्याच्या सक्त सूचना संबंधित यंत्रणांना दिल्या असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><><>**

लंडनच्या लॉर्ड्स मैदानावर झालेल्या पहिल्या महिला कसोटी सामन्यात भारतानं इंग्लंडवर २७० धावांनी दणदणित विजय मिळवला.  विजयासाठी भारतानं दिलेल्या ४५७ धावांच्या आव्हानापुढं यजमान इंग्लंडचा दुसरा आज डाव चौथ्या दिवशीच १८६ धावांत आटोपला. भारताकडून स्नेह राणानं ४ बळी घेतले, तर सायली सातघरे, क्रांती गौड आणि दीप्ती शर्मा यांनी प्रत्येकी दोन बळी मिळवले.

भारतानं पहिल्या डावात २८५ धावा केल्या होत्या, आणि इंग्लंडचा पहिला डाव १७० धावांत गुंडाळला होता. त्यात गोलंदाज क्रांती गौडन ५ बळी घेतले होते.

काल ७ बाद ३४१ धावांवर आपला दुसरा डाव घोषित केल्यामुळे भारताची सामन्यातली एकूण आघाडी ४५६ झाली होती. यात यष्टिरक्षक-फलंदाज यस्तिका भाटियाच्या ११३ धावांचा मोलाचा वाटा होता. यस्तिका ही लॉर्ड्सवर कसोटी शतक झळकावणारी पहिली महिला ठरली.

<><><><><>

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या उद्यम इन्क्युबेशन फाउंडेशनमधील ‘बिलियन कार्बन’ या स्टार्टअपच्या संस्थापिका अंकिता विजयवर्गीय यांना जागतिक स्तरावरचा प्रतिष्ठेचा बेयर फाउंडेशनचा यंदाचा महिला उद्योजक पुरस्कार जाहीर झाला आहे. ‘बिलियन कार्बन’ हे हवामान बदल, सेंद्रिय कचरा व्यवस्थापन आणि शाश्वत विकास या क्षेत्रात नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान विकसित करणारे अग्रगण्य भारतीय क्लायमेट-टेक स्टार्टअप आहे.

विजयवर्गीय अभियांत्रिकी पदवीधर असून त्यांनी लंडन बिझनेस स्कूलमधून एमबीए पूर्ण केलं आहे. त्यांनी कॉर्पोरेट क्षेत्रातील यशस्वी कारकीर्द सोडून हवामान बदलाच्या समस्येवर परिणामकारक उपाय विकसित करण्यासाठी उद्योजकतेचा मार्ग स्वीकारला.

<><><><><>

टीईटी पेपर फुटीच्या प्रकरणात भिवंडी न्यायालयानं आज आणखी दोन आरोपींना २४ जुलैपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली. या प्रकरणातले सर्व १२ आरोपी आता न्यायालयीन कोठडीत असून, टीईटी पेपर फुटीत सामील असलेले इतर संभाव्य आरोपी, संपूर्ण जाळं आणि कटाचा पोलीस तपास करत आहेत.

<><><><><>

सुप्रसिद्ध हॉलिवूड चित्रपट अभिनेते सॅम नील यांचं आज ऑस्टेलियातल्या सिडनी शहरात निधन झालं. ते ७८ वर्षांचे होते. जुरासिक पार्क, द पियानो अशा चित्रपटांमधल्या भूमिकांसाठी ते ओळखले जात होत. २०२३ मध्ये त्यांना कर्करोग झाल्याचं निदान झालं होतं. त्यानंतर ते कर्करोगमुक्त झाले होते. मात्र अचानक उद्भवलेल्या वैद्यकीय गुंतागुंतीमुळे त्याचं निधन झालं.

**<><><><><>**

बीड जिल्ह्यातल्या गेवराई तालुक्यातल्या जातेगाव इथं स्थानिक गुन्हे शाखेनं सुमारे ८ लाख रुपयांचा प्रतिबंधीत गुटखा जप्त केला. पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई केली. या प्रकरणी तलवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून मेघगर्जेनेसह वीजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे.

//<><><><><>//